

# डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली?




डॉ. यशवंत मनोहर

# डॉ. आंबेडकरांनी
# मनुस्मृती का जाळली ?

डॉ. यशवंत मनोहर

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

DR. AMBEDKARANNI MANUSMRUTI KA JALLI ?

DR. YASHWANT MANOHAR

डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली ?

डॉ. यशवंत मनोहर

•

प्रकाशक

नितीन धनराज हनवते

युगसाक्षी प्रकाशन

राहुल अपार्टमेंट, प्लॉट १७२

बी, पहिला माळा, एफ ३

त्रिमूर्तीनगर, रिंग रोड, नागपूर - ४४० ०२२.

मो.फोन : ९८५०३३९४२८

•

© डॉ. पुष्पलता यशवंत मनोहर

'लुम्बिनी', ४५ लोकसेवानगर, नागपूर - ४४००२२

दूरभाष : ०७१२ - २२३७६५६

मो. फोन : ९४२२१०२३९६

•

प्रथमावृत्ती : अशोक विजयादशमी २००५

•

संगणकीय अक्षर जुळवणी

संकेत कॉम्प्युटर्स, एन.आय.टी. संकुल क्र. ६३

हिल रोड, गांधीनगर, नागपूर - ४४००१०

मो. फोन : ९८२२६९७०४८

•

मुद्रक

निखील एंटरप्राईजेस

अभ्यंकरनगर, नागपूर - ४४००१०

•

मुखपृष्ठ मांडणी

भाऊ दांदडे, नागपूर

•

मूल्य रू. २५/- फक्त

# डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली ?

डॉ. यशवंत मनोहर

भारतीय संविधानाचे शिल्पकार क्रांतीनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ साली मनुस्मृती जाहीरपणे जाळली आणि २६ जानेवारी १९५० रोजी या मनुस्मृतीला भारतीय संविधान हा पर्याय दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली ? मनुस्मृतीमध्ये असे कोणते जहर भरलेले आहे की ज्यामुळे या देशातील अनेक पिढ्यांना माणूस म्हणून जगणे अशक्य केले ? आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली म्हणजे म्हणजे नेमके काय जाळले ? या मनुस्मृतीची निर्मिती केव्हा झाली आणि तिचा खरा लेखक कोण ? या प्रश्नांच्या अनुषंगाने मनुस्मृती या घृणास्पद ग्रंथाचे स्वरूप विशद करून सांगायचे आहे.

**मनू कोण होता ?**

ज्याच्या नावाने मनुस्मृती ओळखली जाते तो मनू कोण होता ? पुराणग्रंथांमध्ये अनेक मनूंचा वेगवेगळ्या संदर्भात उल्लेख होतो. मनू एक की अनेक या प्रश्नाच्या अनुषंगाने मनूचा परिचय करून घेऊ ! मनुस्मृतीत मनुस्मृती कशी निर्माण झाली याबद्दलची कथा पहिल्या अध्यायाच्या सुरवातीलाच आलेली आहे. ब्रह्मदेवाने सृष्टीकर्ता विराटपुरुष निर्माण केला. त्याच्यापासून मनूचा जन्म झाला. सृष्टीनिर्मितीच्या वेळी ब्रह्मदेवाने एक धर्मशास्त्र निर्माण करून दिले आणि मनूने ते मरीची वगैरे महर्षींना शिकविले आणि भृगुमुनीने ते मनूजवळून संपूर्ण शिकून घेतले.

**" एतद्वोऽयं भृगुः शास्त्रं श्रावयिष्यत्यशेषतः।**
**एतद्धि मत्तोऽधिजगे सर्वमेषोऽ खिलं मुनिः " (१:५९)**

असे मनूनेच स्वतः मनुस्मृतीत म्हटले आहे. त्याचा अर्थ असा की भृगुमुनी तुम्हास हे शास्त्र कथन करतील; कारण त्यांनी त्याचा माझ्याजवळून संपूर्ण व उत्कृष्ट अभ्यास केला आहे आणि पुढे भृगुमुनीने ते मनूच्या आज्ञेनुसारच ऋषींना सांगितले. आपण जिला मनुस्मृती म्हणतो ती अशी भृगू ऋषीने सांगितलेली मानवधर्माची संहिता आहे. मनुस्मृतीच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'इति मानवे धर्मशास्त्रे भृगुप्रोक्तायां संहितायां' असे वचन येते. मानवधर्मशास्त्र म्हणजे मनूने सांगितलेले धर्मशास्त्र. भृगूंनी सांगितलेल्या याच मनूच्या मानवधर्मशास्त्राला 'मनुस्मृती' अस म्हटले जाते.

## स्मृती म्हणजे काय ?

वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, पुराणे आणि दर्शने या ग्रंथांच्याशिवाय धर्मसूत्रांवर आधारलेले आणि विवाह, विवाहाचे प्रकार, पुत्रांचे विविध भेद, दत्तक पुत्राचे विधान, धनविभाग, दायभाग, श्राद्ध, स्त्रीधन, चार वर्ण आणि त्यांची कर्तव्ये, राजा, आचार्य, विद्यार्थी यासंबंधीचे तसेच नियमभंग करण्याच्या संदर्भात करावयाचे शासन या अनुषंगाने आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त इत्यादींचे विवेचन करणारे ग्रंथ स्मृतीग्रंथ मानले जातात.

अशा स्मृतींची संख्या सुमारे शंभर असून गौतम, आपस्तंभ, बौधायन आणि मनू यांच्या स्मृती इ.स. पूर्वकाळात निर्माण झाल्या असून याज्ञवल्क्य, पाराशर, नारद या स्मृती इ.स. नंतरच्या काळात निर्माण झाल्या आहेत. इ.स. १००० पर्यंत या स्मृती निर्माण होत होत्या असे म्हटलेले आहे. या स्मृती स्वतःला धर्मशास्त्र म्हणवून घेतात. या स्मृतींमध्ये मनुस्मृती ही सर्वश्रेष्ठ मानली जाते.

मनूच्या धर्मशास्त्राची प्रशंसा अनेक ठिकाणी केलेली आहे. मनूने जे जे सांगितले ते ते औषधासारखे हितकारक - 'यन्मनुराह तद् भेषजम्' आहे असे यजुर्वेदात सांगितले आहे. तैत्तिरीय संहितेत 'तद्वै किञ्च मनुरवदत् तद् भेषजम्' असे म्हटले आहे. मनुस्मृतीमध्ये सांगितला आहे तो वेदातीलच धर्म आहे असे स्मृतीकार बृहस्पतीने म्हटले आहे.

## मनुस्मृतीचा खरा लेखक कोण ?

मनुस्मृतीचा खरा लेखक सुमती भार्गव हा आहे. इ.स. चौथ्या शतकातील नारदस्मृतीमध्ये हा गौप्यस्फोट केला गेला आहे. नारदाच्या म्हणण्यानुसार मनूच्या संहितेची रचना सुमती भार्गव यांनी केली. आता आपल्यापुढे प्रश्न असा निर्माण होतो की सुमती भार्गव यांनी रचलेली स्मृती मनुस्मृती म्हणून का प्रसिद्ध झाली वा सुमती भार्गव यांनी ती मनूच्या नावाने का प्रसिद्ध केली ? प्राचीन भारतात मनूच्या नावाचा दबदबा होता. या नावाला मोठे वलय होते. मनू अनेक होते असेही सांगितले जाते. सुमती भार्गवांनी भूतकाळात आदरणीय असलेल्या मनूच्या नावाचा उपयोग करायचा निर्णय घेतला. आपल्या नावापेक्षा आपला विचार लोकांच्या मनात भिनणे त्यांनी मोलाचे मानले. सुमती भार्गव म्हणजे भृगू ऋषी ! भृगूने मनूच्या प्रतिष्ठाप्राप्त नावाचा उपयोग करून आपल्या विचारांना पावित्र्य प्राप्त करून देण्याची पद्धती अनुसरली. सुमती भार्गव हा प्राचीन काळातील ब्राह्मणांच्या भृगू वंशातील ऋषी होता. याचा अर्थ सुमती भार्गव या ब्राह्मण ऋषीने मनुस्मृतीची रचना केली आणि मनू या तोवरच्या प्रतिष्ठित नावाने खपवली.

## भृगूने मनुस्मृतीची रचना कधी केली ?

सुमती भार्गवाने मनुस्मृतीची रचना इ.पू. २०० ते इ.स. २०० या काळात कधीतरी केली असे बहुतेक अभ्यासकांनी मानलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचा लेखनकाळ अधिक नेटका करण्याचा प्रयत्न केला. (रायटिंग्ज ॲन्ड स्पीचेस, खंड ३, महाराष्ट्र शासन १९८७, पृ. २७०-२७१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचा लेखनकाळ तत्कालीन राजकीय स्थित्यंतरांच्या संदर्भात निश्चित करण्याचा प्रयत्न केला. सम्राट अशोकाचा नातू बृहद्रथ ! इ.पू. १८५ मध्ये पुष्यमित्र शुंग या ब्राह्मणाने बुद्ध धम्माचा विनाश करण्यासाठी मौर्य सम्राट बृहद्रथाचा वध केला आणि ब्राह्मणी सत्ता प्रस्थापित केली. डॉ. आंबेडकरांनी हे स्वच्छपणे सांगितले आहे की इ.स.पू. १७० ते इ.स. पू. १५० या काळात सुमती भार्गवाने मनुस्मृतीची रचना केली आणि आपल्या राज्याचा कायदा म्हणून पुष्यमित्र शुंगाने या मनुस्मृतीला मान्यता प्राप्त करून दिली. डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे की - " ... the code known as Manu Smriti was promulgated by Pushyamitra as embodying the principles of Brahmanic Revolution against the Buddhist state of the Mauryas" (उक्त : पृ. १७१) याचा अर्थ बुद्धाच्या अनुशासनानुसार चालणाऱ्या मौर्य साम्राज्याच्या विरुद्ध पुष्यमित्राने ब्राह्मणवादाची सांस्कृतिक सत्ता प्रस्थापित करण्यासाठी मनुस्मृतीचा आपल्या राज्याचे धर्मशास्त्र म्हणूनच केवळ नव्हे तर समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र म्हणूनही पुरस्कार केला.

## मनू कोण होता ?

ज्याच्या प्रतिष्ठावंत नावाने सुमती भार्गवाने आपली स्मृती सांगितली तो मनू कोण होता ? क्षत्रिय होता की ब्राह्मण होता ? तो चातुर्वर्ण्यसंस्थेतील कोणत्या वर्णाचा होता ? या प्रश्नाचा विचार आपल्याला करावयाचा आहे.

जगप्रलयानंतर प्रथम परमेश्वर निर्माण झाला. प्रजोत्पत्ती करण्यासाठी परमेश्वराने पाणी उत्पन्न होण्याची इच्छा केली. पाणी निर्माण झाले. त्यात त्याने शक्ती रूप बीज पेरले. त्या बीजातून सूर्यासारखे तेजस्वी अंडे निर्माण झाले. त्यातून प्रजा निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. ब्रह्मदेवाने मुखातून ब्राह्मण, बाहूतून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पायापासून शूद्र हे वर्ण निर्माण केले. ब्रह्माने आपल्या शरीराच्या अर्ध्या अर्ध्या भागातून स्त्री आणि पुरुष निर्माण केले. त्यातील स्त्रीपासून विराट नावाचा पुरुष निर्माण झाला. त्या विराट पुरुषाच्या तपोबलाने त्याच्याच पोटी मनू निर्माण झाला. मनू या विराट पुरुषाचा मुलगा आहे. या मनूने नंतर मरिची, अत्री,

निर्मिती केली. मनुस्मृतीतच स्वयंभू मनूसह स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष व तेजस्वी वैवस्वत या सहा मनूंचा निर्देश आहे. याप्रकारे पहिल्या स्वयंभू मनूसकट इतर सर्व मनूंनी स्थावरजंगम सृष्टी निर्माण केली असे मनुस्मृतीच सांगते.

भगवद्गीतेत परमेश्वरापासून चार मनू निर्माण झाले असे म्हटलेले आहे. सृष्टी जन्माला आल्यापासून तिचा अंत होईपर्यंतच्या काळाचे चौदा विभाग पुराणांनी पाडले आहेत. हे विभाग म्हणजे मन्वंतरे होत. एकेका विभागाचा एक याप्रकारे चौदा मनूंची स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, दक्षसावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, रौच्य आणि भौत्य अशी नावेही दिलेली आहेत. सध्या सातवे मन्वंतर सुरू असून वैवस्वत मनू या मन्वंतराचा अधिपती आहे असे पुराणे मानतात. नंतरची मन्वतरे ही आगामी म्हणायला हवीत. पण या प्रत्येक मन्वंतराचा मनू राजा आहे. हे चौदा मनू क्षत्रिय होते असे म्हणता येईल.

डॉ. पां.वा. काणे यांनी म्हटले आहे की ''पुराणात वर्णन केलेल्या मनूने अथवा मानवजातीचा आद्यपुरुष म्हणून ऋग्वेदात ज्याचा उल्लेख केला आहे त्या मनूने हा ग्रंथ रचला असणे शक्य नाही.'' (धर्मशास्त्राचा इतिहास : पूर्वार्ध, १९८०, पृ. ४८) वेदग्रंथात मनू हा मानवजातीचा आद्यपुरुष होय असे म्हटले आहे. महाभारतातही स्वायंभुव मनू असा उल्लेख आहे उपलब्ध मनुस्मृती हा ग्रंथ स्वायंभुव मनूने केल्याचे म्हणते. ''महाभारतात स्वायंभुव मनूने धर्मशास्त्राचा प्रसार केला आणि प्राचेतस मनूने राजनीतिशास्त्राचा (अर्थशास्त्राचा) प्रसार केला असे म्हटले आहे. आरंभी मनूच्या नावावर दोन वेगळे ग्रंथ अस्तित्वात असून मनुस्मृतीचा जो कोणी कर्ता असेल त्याने त्या दोन्ही ग्रंथातील माहिती समाविष्ट करून आपला ग्रंथ रचना असावा.'' (धर्मशास्त्राचा इतिहास : पूर्वार्ध, पृ. ४८) आणि हे सर्व करणारा भयंकर माणूस सुमती भार्गव असावा असे आपणास म्हणता येईल.

आपण ज्या मनुस्मृतीचा विचार करीत आहोत तिच्यातील श्लोकांची संख्या २६८४ एवढी भरते. पण नारदस्मृतीत नारद म्हणतो की सुमती भार्गवाने मनूचा विराट ग्रंथ ४००० श्लोकांमध्ये बसवला. नारदाने वृद्ध मनू आणि बृहन् मनू यांच्या श्लोकांचाही अंतर्भाव या ४००० श्लोकांमध्ये केलेला दिसतो.

मनूचा अंतर्भाव कोणत्या वर्णात करता येणे अशक्य दिसते; पण मनू ब्राह्मण असला काय ? वा क्षत्रिय असला काय ? किंवा वर्णातीत असला काय? त्याच्या नावाने सुमती भार्गवाने सांगितलेल्या मनुस्मृतीत ब्राह्मणांचे वर्चस्व ठासून भरलेले आहे आणि विषमतेचे जहर हाच या मनुस्मृतीचा प्राण आहे.

## डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती कशी जाळली ?

मागल्या शतकात जोतीराव फुल्यांनी 'जाळून टाकावा ॥ मनुग्रंथ ॥' असे म्हटले होते. (समग्र वाङ्मय, महाराष्ट्र शासन, १९९१, पृ. ५५१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृती जाळली. मनुस्मृती जाळण्याची योजना डॉ. आंबेडकरांनी आधीच ठरविलेली होती. ती योजनाबद्ध कृती होती. महाडला परिषदेसाठी तयार करण्यात आलेल्या मंडपाच्या दारातच शृंगारलेली वेदी तयार करण्यात आली होती. प्रत्यक्ष सत्याग्रहाच्या परिषदेतही तसा ठराव झाला होता. रात्री ९ वाजता त्या वेदीवर मनुस्मृती एका अस्पृश्य बैराग्याच्या हस्ते जाळण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी याच परिषदेत नव्या समताभारताच्या निर्मितीसाठी उपकारक ठरेल अशा नव्या स्मृतीची मागणी केली. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर : कीर, नववी आवृत्ती १९९२, पृ. १०५-१०६) या ठिकाणीच मांडल्या गेलेल्या ठरावातला दुसरा ठराव मनुस्मृतीच्या संदर्भातला आहे. तो ठराव असा : ''शुद्र जातींचा उपमर्द करणारी, त्यांची प्रगती खुंटविणारी, त्यांचे आत्मबळ नष्ट करून त्यांची सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरी कायम करणारी मनुस्मृतीतील पुढील वचने ध्यानात घेऊन व वरील हिंदुमात्राच्या जन्मसिद्ध हक्कांच्या जाहीरनाम्यात गोवलेल्या तत्त्वाशी तुलना करून सदरहू ग्रंथ धर्मग्रंथ या पवित्र नावास शोभण्यास अपात्र आहे असे या परिषदेचे ठाम मत झाले आहे व ते मत व्यक्त करण्यासाठी असल्या लोकविग्रही व माणुसकीचा उच्छेद करणाऱ्या धर्मग्रंथाचा मी दहनविधी करीत आहे.'' (बहिष्कृत भारत आणि मूकनायक : महाराष्ट्र शासन १९९०, पृ. १६३-१६७)

मनुस्मृती जाळण्याचे कारण बाबासाहेब आंबेडकरांनी ३ फेब्रुवारी १९२८ च्या 'बहिष्कृत भारत'च्या अंकातही दिलेले आहे. 'स्वराज्य' या पत्राचे संपादक रा. भुस्कुटे यांनी मनुस्मृती जाळण्याच्या संदर्भात काही आक्षेप घेणारे पत्र बाबासाहेब आंबेडकरांना पाठविले होते. त्यातील आक्षेपांना बाबासाहेबांनी सडेतोड उत्तर दिले. त्यात बाबासाहेब आंबेडकर म्हणतात - ''आम्ही जे मनुस्मृतीचे वाचन केले आहे त्यावरून आमची अशी खात्री झाली आहे की, त्या ग्रंथात शूद्र जातीची निंदा करणारी, त्यांचा उपमर्द करणारी; कुटाळ उत्पत्तीचा कलंक त्यांच्या माथी मारणारी व त्यांच्याविषयी समाजात अनादर वाढविणारी वचने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून, धर्माची विटंबना आहे; आणि समतेचा मागमूस नसून, असमतेची मात्र धुळवड घातली आहे. स्वयंनिर्णयाचे तत्त्व प्रस्थापित करावयास निघालेल्या सुधारणावाद्यास असला ग्रंथ कधीच मान्य होणे शक्य नाही व तो अस्पृश्य वर्गासही मान्य नाही एवढेच दर्शविण्याकरिता महाड येथे त्याची होळी करण्यात आली.'' (पृ. १५८ : २) रिडल्स

इन हिंदुइझम (खंड ४) या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ व्या क्रमांकाचे एक संपूर्ण रिडलच MANU'S MADNESS म्हणजे 'मनूचा वेडेपणा' या नावाने लिहिले आहे. इथेही त्यांनी मनुस्मृतीची चिकित्सा केलेली आहे. बाराव्या खंडातही (पृ. ७१९ - ७२४) डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीची समीक्षा केलेली आहे. काही लोकांचे असे म्हणणे असू शकते की मनुस्मृती ही गतकाळात होऊन गेली. आता हिंदूंच्या वर्तनाशी तिचा काहीही संबंध नाही. पण बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की असे समजणारांची ही मोठी गफलत आहे. त्यांनी लिहिले आहे. "Manu is not a matter of the past. It is even more than a past of the present. It is a 'living past' and therefore as really present as any present can be." (पृ. ७१९) याप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार मनुस्मृती हा वर्तमानकाळात विद्यमान असलेला भूतकाळ आहे. याचा अर्थ असा की मनुस्मृतीची निर्मिती इ.स. च्या आरंभकाळात झाली असली तरी तिच्या विषारी शिकवणुकीचा प्रभाव आजही लोकांच्या मनावर आहे. मनूने शिकविलेली वर्णांची आणि जातींची विषमता, त्याने शिकविलेला देव आणि दैववाद, त्याने शिकविलेली अंधश्रद्धा आणि परस्परतुच्छता या गोष्टी केवळच आज कायम आहेत असे नाही तर त्या आज अधिकच कडवे रूप धारण करीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली त्याची ही अशी कारणे आहेत. 'मनुस्मृती' या नावाचे एक पुस्तक जाळणे, मनुस्मृती या पुस्तकाची एक प्रत जाळणे हा मनुस्मृती जाळण्यामागचा उद्देश नाही. मनुस्मृती जाळणे याचा अर्थ मनुस्मृतीने लोकांच्या मनात भरलेली विषमता जाळणे असा आहे. मनुस्मृतीने लोकांच्या मनावर उच्चनीचतेने संस्कार केलेले आहेत आणि या संस्कारापासून ती लोकांना मुक्तच होऊ देत नाही. या देशातील लोकांची मने मनुस्मृतीने विषमतेशी पक्की बांधून ठेवली आहेत. त्यामुळे लोकांना समता ही गोष्ट अस्तित्वात असू शकते असे वाटतच नाही. म्हणूनच मनुस्मृती जाळणे म्हणजे लोकांची ही समजूत जाळणे होय. याप्रकारे लोकांची मने बदलणे, लोकांचे मानसशास्त्र बदलणे अर्थात मनांतर करणे हा मनुस्मृती जाळण्यामागचा उद्देश आहे. समता जाळणारा हा ग्रंथ जाळणे, लोकांची माणुसकी जाळणारा हा ग्रंथ जाळणे हा मनुस्मृती जाळण्यामागचा उद्देश आहे.

माणसांमध्ये उच्चनीचतेचे हलाहल पसरवणारा मनूचा कायदा आता चालू ठेवणे योग्य नाही. मानवी मूल्यांच्या दृष्टीने, मानवअधिकाराच्या प्रतिष्ठेसाठी हा जन्मजात विषमता सांगणारा, सनातन म्हणजे विश्वारंभापासूनचा आणि तो कधी बदलू नये या हेतूने सांगितलेला हा कायदा यापुढे चालणे योग्य नाही. समतेला, स्वातंत्र्याला, बंधुतेला आणि सामाजिक न्यायालाही जन्मालाच येऊ न देणारा हा

कायदा जाळून टाकायलाच हवा. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तीव्रपणे वाटले आणि त्यांनी मनूच्या विषमतेला आग लावली. पवित्र मानला गेलेला हा विषमतेचा कायदा जाळला जाऊ शकतो हे लोकांच्या मनावर बिंबवावे आणि त्यांच्या मनात स्वतंत्र विचार करण्याची, समतेची प्रस्थापना करण्याची ताकद जागवावी हा मनुस्मृती जाळण्यामागचा उद्देश होता हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे.

### मनुस्मृतीतील विषमतेचे स्वरूप

आता मनुस्मृतीमधील विषमतेचे स्वरूप पाहू. ही विषमता मनुस्मृतीमधील श्लोकांचाच हवाला देऊन आपण पाहू. म्हणजे मनुस्मृतीमधीलच श्लोकांचे पुरावे देऊन मनुस्मृती ही सामाजिक, आर्थिक अशी सर्व प्रकारची विषमता सांगण्यासाठीच कशी जन्माला आली ते पाहू.

विद्यमान मनुस्मृतीत एकूण बारा अध्याय आहेत. १ : जगाची उत्पत्ती, २ : संस्कारविधि, व्रतचर्या व नमस्कारादि उपचार, ३ : विवाह, महायज्ञ व श्राद्धकल्प, ४ : वृत्तीचे लक्षण व स्नातक, ५ : भक्ष्याभक्ष्यनिर्णय, आशौच व द्रव्यशुद्धि, ६ : वानप्रस्थ व यति यांचे धर्म, ७ : राजांचे सर्व धर्म, ८ : न्यायनिरूपण, ९ : स्त्री-पुरुष धर्म, दायविभाग, द्युत, चोर व वैश्य-शुद्र धर्म, १० : संकर जाती व आपद्धर्म, ११ : प्रायश्चित्त विधी आणि १२ अध्यायाचे नाव आहे शुभाशुभ कर्मफल ! हे असे बारा अध्याय मनुस्मृतीत आहेत आणि या बारा अध्यायांमधील श्लोकांची संख्या २६८४ एवढी आहे.

### मनूची सर्वज्ञता ही अंधश्रद्धा

मनू सर्वज्ञ असल्याने त्याने सांगितलेला धर्म सर्व वेदात आहे हे -

**" यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः।**
**सर्वोऽभिहितो वेदे सर्वज्ञानमयो हि सः "** (२ : ७)

या श्लोकात मनुस्मृती सांगते. ज्ञान म्हणजे काय ? हे थोडेही कळले आणि मानवी ज्ञानाची अव्याहत आजवर सुरू असलेली वाटचाल लक्षात घेतली तर कोणतीही सुज्ञ व्यक्ती स्वतःलाही किंवा इतर कोणालाही 'सर्वज्ञ' म्हणण्याचा अज्ञपणा किंवा अडाणीपणा करणार नाही. ज्ञान ही अंतहीन प्रक्रिया आहे. ज्ञानाचा अंत कुठेच होणे शक्य नाही. शहाण्या माणसाने ज्ञानाची कोणतीही अवस्था ही अंतिम होय असे मानू नये. ज्याला कोणतीही अंतिम सीमा नाही ते ज्ञान अशीच ज्ञानाची व्याख्या करायला हवी. व्यक्तीला ज्ञानाच्या मर्यादा असू शकतात. पण ज्ञान कोणत्याही व्यक्तीच्या

मर्यादेपाशी थांबत नाही. व्यक्तीला असणाऱ्या ज्ञानाच्या मर्यादा उल्लंघून ज्ञान पुढे जाते. तेव्हा नवे ज्ञान म्हणजे मागील ज्ञानाच्या मर्यादांचे उल्लंघन ! मानवाला नवनवे ज्ञान शक्य आहे. माणूस नवनव्या ज्ञानाचे प्रदेश पादाक्रांत करीत राहील. पण म्हणूनच ज्ञान नवनवे असते. पण अंतिम नसते. अंतिम ज्ञानानंतर विचार करण्याचे प्रयोजनच संपून जाते. मानवी जीवनाची अन्वर्थकताच नष्ट होऊन जाते. माणूस सतत विचार करतो. इतरांनी केलेल्या विचारांनी त्याची स्वतंत्र अशी ज्ञानाची भूक भागत नाही. स्वतःच्या अस्तित्वाच्या अन्वर्थकतेसाठी त्याला विचार करावाच लागतो. माणूस ही सतत विचार करणारी एक व्यवस्था आहे आणि मानवी जीवन सतत सुरू आहे तोवर ज्ञानाचा प्रवास सुरूच राहणार आहे. अंतिम ज्ञान नावाची गोष्ट कुठेच नसते. कारण ज्ञान हे अंतहीन आहे. म्हणून एखाद्या व्यक्तीला सर्वज्ञ मानणे हा ज्ञान मीमांसेच्या क्षेत्रातला विनोद असतो. अशा विनोदाला पसंती दाखविणे हाही मूर्खपणाच ठरतो.

इथे लक्षात घ्यायचे ते हे की मनूला सर्वज्ञ मानणे ही बाब अत्यंत चुकीची आहे. ईश्वरवाली वा धर्मवाली मंडळी लोकांना आकर्षित करण्यासाठी अशा फसव्या जाहिराती करीत असतात.

### मनुस्मृतीचा समतेच्या विचाराला विरोध

मनुस्मृतीला विचारस्वातंत्र्य मान्य नाही. चार वर्णांची विषमतेवर आधारलेली समाजसंस्था ही सनातन आहे, ती परमेश्वरानेच स्वतः निर्माण केलेली आहे, त्यामुळे ती चिरंतन आहे, तिच्यात बदल करणे वा बदल करण्याचा विचारही मनात आणणे हा अधर्म ठरतो. ही मनुस्मृतीची भूमिका आहे.

> **" श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।**
> **ते सर्वार्थेष्वमीमांस्ये ताभ्यां धर्मो हि निर्बभौ "** (२ : १०)

> **" योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्द्विजः।**
> **स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः "** (२ : ११)

वेद आणि धर्मशास्त्र म्हणजे श्रुति आणि स्मृति यांच्यापासून धर्माचा उदय झाला असल्याने श्रुति वा स्मृति यांच्याविरुद्ध मत मांडू नये आणि या दोन शास्त्रांचे मूल्य जो मानणार नाही त्या वेदनिंदक नास्तिकाला धर्मबहिष्कृत करावे असा वरील दोन्ही श्लोकांचा अर्थ आहे. याचा अर्थ वेदाच्या आणि स्मृतांच्या विरुद्ध कोणी बोलू नये, वेद आणि स्मृती अमान्य करणाऱ्या, त्यांची निंदा करणाऱ्या नास्तिकाला धर्मबहिष्कृत करावे, म्हणजे मनुस्मृतीतील चातुर्वर्ण्याची अभेद्य चौकट पवित्र मानावी आणि ती कायम राहावी, तिला तोडण्याचा कोणी प्रयत्न करू नये असा सज्जड दमही मनूने देऊन

ठेवला. म्हणजे शतकानुशतके माणसांनी या धाकामुळे विषमतेला पवित्र मानले. आपणाला कोणी नास्तिक ठरवू नये आणि धर्मातून हद्दपार करू नये म्हणून माणसांनी इथे मनूच्या आदेशाचे पालन केले आणि करीतही आहेत. मनू विद्यमान भूतकाळ Living Post आहे त्याचे हे कारण आहे.

**विश्वनिर्मितीचे खोटे स्पष्टीकरण**

विश्व कसे निर्माण झाले, विश्वात माणसाची निर्मिती कशी झाली अशा प्रश्नांसंबंधी मनुस्मृती जे सांगते ते दैवी स्पष्टीकरण अजिबात पटण्यासारखे नाही. पृथ्वी, पृथ्वीवरील मानव आणि वर्णव्यवस्था या सर्वच गोष्टी ईश्वराने निर्माण केल्या असे मनुस्मृतीचे म्हणणे आहे. जगातल्या सर्वच धर्मांनी अशाच प्रकारच्या अद्भुत कथा सांगितल्या आहेत. मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायातील पाचव्या श्लोकापासून ही अद्भुतकथा सुरू होते आणि साधारणतः एकेचाळीसाव्या श्लोकापर्यंत ती चालते. कथा अशी : हे जग प्रलयाचे वेळी अंधारात गडप झाले होते. तिथे ते निश्चेष्ट होऊन पडले होते. प्रलय संपल्यानंतर परमेश्वर निर्माण झाला. निर्गुण भक्ती करता येण्यासारखा, सर्व प्राणीमात्र, वेद, इतिहास, पुराणे इत्यादिकात प्रसिद्ध असलेला, नेत्र, कान इत्यादिकांना अप्राप्य, अवयवशून्य, अमर, प्राणीमात्रांचा आत्मा व अचिंत्य असा परमेश्वर महातत्त्व म्हणून रूपास आला. प्रजोत्पत्ती करण्यासाठी परमेश्वराने पाणी निर्माण होण्याची इच्छा करताच पाणी निर्माण झाले. त्यात त्याने शक्तीरूप बीज पेरले. त्या बीजापासून सूर्यासारखे तेज असणारे एक सोन्यासारखे अंडे निर्माण झाले. त्यातच प्रत्यक्ष प्रजोत्पादक ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. ब्रह्मा त्या अंड्यात एक वर्ष राहिला. नंतर स्वतःच्या इच्छेनेच त्या अंड्याची दोन शकले करून बाहेर आला. अंड्याच्या वरच्या शकलापासून स्वर्ग आणि खालच्या शकलापासून पृथ्वी निर्माण करून त्यात आकाश, अष्ट दिशा आणि जळाब्धीची निर्मिती केली. त्यानंतर चतुराननाने मनाची ईश्वरापासून उत्पत्ती केली. अहंकार निर्माण केला. ब्रह्माने सर्व प्राणीमात्रांची निर्मिती केली. ब्रह्मरूप परमेश्वराने पूर्वी सृष्टी जशी नावादिकांनी प्रचलित होती तशीच पुन्हा निर्माण केली. सृष्टी पुन्हा निर्माण केली म्हणजे काय ? हे याच अध्यायातील ५१ ते ५५ या क्रमांकाच्या श्लोकांमध्ये सांगितले आहे. म्हणजे परमेश्वर पुन्हा पुन्हा जगाची निर्मिती करतो. पुन्हा प्रलयाच्या वेळी उपसंहार करतो. ही माहितीही मनुस्मृतीतच आलेली आहे. तेव्हा प्रलयापूर्वी सृष्टी जशी प्रचलित होती तशीच निर्माण केली याचा अर्थ या सृष्टीत असलेल्या वर्णव्यवस्था, स्त्री-पुरुष भेद या गोष्टी या पूर्वीच्याही सृष्टीत होत्या असे म्हणावे लागेल. ही समाजव्यवस्था सनातन आहे याचा अर्थ असा खूप लांबवर पसरलेला आहे. कुंभाराने कुंभ निर्माण

करावे, कोष्ट्याने कापड विणावे इत्यादी व्यवस्थादेखील केली. ब्रह्मदेवाने सकर्मी प्राणी, पाषाण, देव, देवाचे प्रकार निर्माण केले. ब्रह्माने वेद निर्माण केले. दिवस, महिने, ऋतु, नक्षत्रे, ग्रह, नद्या, समुद्र, पर्वत अशी सर्व सृष्टी त्याने निर्माण केली. महत्त्वाचे म्हणजे केलेल्या कार्यात धर्माधर्म म्हणजे काय ? हेही त्याने सविस्तर कथन केले. ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या प्राण्यास जो धंदा नेमून दिला तोच धंदा तो प्राणी पुन्हा पुन्हा उत्पन्न झाल्यामुळे करू लागला. ब्रह्मदेवाने मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पायापासून शुद्रांची उत्पत्ती केली. ब्रह्माने त्याच्या शरीराचे अर्धे अर्धे असे स्त्री व पुरुष दोन निर्माण केले. त्या स्त्रीपासून मैथुनधर्माने विराट नावाचा पुरुष निर्माण केला. मनु् हा या विराट पुरुषाचा मुलगा आहे असे मनुस्मृती सांगते.

सृष्टी आणि तिच्यामधील जीवनिर्मितीची ही अद्‌भुत कादंबरी आजचा प्रायमरी शाळेत शिकणारा विद्यार्थीही मान्य करणार नाही. कारण त्याने भूगोल अभ्यासला आहे. त्याने विज्ञान अभ्यासले आहे. पण भीतीपोटी लोकांनी हे भ्रम पवित्र मानलेले असतात. या काल्पनिक आणि चमत्कारीक गोष्टी लोकांनी खऱ्या मानलेल्या असतात. अर्थात मनुस्मृती या सर्वच गोष्टी विशिष्ट हेतूने सांगत आहे. लोकांनी या गोष्टींना आंधळेपणी चिकटून राहावे आणि ब्राह्मणाचे सर्वश्रेष्ठत्व सांगणारी तसेच इतर सर्वांनाच दुय्यमत्व देणारी समाजरचना कायम टिकून राहावी हा तो दुष्ट आणि अमानुष हेतू होय.

अर्थात मनुस्मृती हे जे सांगत आहे ते नवीन आहे असेही नाही. ते वेदांमध्ये आहेच. ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात हे सर्व आलेले आहेच. याचा अर्थ ही सर्व वैदिक परंपरा लोकांना सतत असत्याशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न करते आहे असा आहे. परमेश्वर, ब्रह्म, स्वर्ग, नरक, प्रलय, निर्मिती, चार वर्णांची निर्मिती या सर्व गोष्टी चार्वाक सांगत नाहीत. बुद्ध सांगत नाही. प्राचीन भारतात जडवादी विचारपरंपरा अत्यंत प्रभावी आहे. ती येथील सिंधुसंस्कृतीमधील अफाट लोकांमध्ये, एतद्देशीय बहुजनांमध्ये प्रचलित आहे. त्यांचे तत्त्वज्ञ इहवादी आहेत. ते वेद वा मनुस्मृतीप्रमाणे अद्‌भुत कथा का सांगत नाहीत ? लोकांना भ्रमांमध्ये का ढकलत नाहीत ? ते लक्षात घेतले पाहिजे.

याचा अर्थ या देशामध्ये हा संस्कृतीसंघर्ष आर्य इथे आल्यापासून सुरू झाला. तो समता आणि विषमता या दोन मूल्यसरणींमधील संघर्ष आहे. "... the one and any object of Pushyamitra's revolution was to destroy Buddhism and re-establish Bramhanism." (खंड ४, पृ. २७३) पुष्यमित्राच्या काळात बौद्ध आणि ब्राह्मणवाद यांच्यात हा मूल्यसंघर्ष असा साकार झाला.

## चार वर्ण आणि कामाचे वाटप

समाजाच्या सर्वच प्रकारच्या भरभराटीसाठी ब्रह्मदेवाने मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पायापासून शुद्रांची उत्पत्ती केली. हे पहिल्या अध्यायातील एकविसाच्या श्लोकातही मनुस्मृतीने सांगितले आहेच. परत याच अध्यायातील सत्त्याऐंशिव्या श्लोकापासून पुढे चार वर्णांची निर्मिती आणि या वर्णांच्या कामाचे वाटप यासंबंधी मनुस्मृतीने विवेचन केलेले आहे.

" सर्वस्यास्य तु सर्गस्य गुप्त्यर्थं स महाद्युतिः।
मुखबाहूरूपज्जानां पृथक्कर्माण्यकल्पयत् " (१ : ८७)

" अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत् " (१ : ८८)

" प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः " (१ : ८९)

" पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।
वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च " (१ : ९०)

" एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत्।
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया " (१ : ९१)

वरील पाच श्लोकांमध्ये मनुस्मृती चार वर्णांची निर्मिती सांगते आणि ब्रह्मदेवानेच या वर्णांच्या कामांची विभागणी कशी केली तेही सांगते. ब्राह्मणांची कामे अशी : शिकणे, शिकविणे, यजन, याजन, दान घेणे वा देणे ही. प्रजारक्षण, दान देणे, यज्ञ, अध्ययन व विषयासक्त नसणे ही क्षत्रियांची कामे होत. पशुपालन, दान, यज्ञ करणे, अध्ययन, व्यापार, सावकारी व शेती ही वैश्यांची कामे होत तर ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तिन्ही वर्णांची कोणताही दुजाभाव न करता सेवा करणे हे देवाने नेमून दिलेले शुद्राचे काम होय.

ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात चार वर्णांच्या कामांची वाटणी अशीच केली गेली आहे.

" तेचि चारी वर्ण। पुससी जरी कोण कोण ।
तरी जयां मुख्य ब्राह्मण धुरेचे कां " (८१८)

" येर क्षत्रिय वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानी।
जे ते वैदिकविधानी। योग्य म्हणौनि " (८१९)

" चौथा शूद्र, जो धनंजया। वेदी लागु नाही तया
तऱ्ही वृत्ति वर्णत्रया। अधीन तयाची " (८२०)

यापुढे ब्राह्मण, क्षत्रिय या वर्णातील लोकांची कामे सांगून झाल्यावर ज्ञानेश्वरीने

" आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे द्विजन्मे तिन्ही वर्ण
ययांचे जे शुश्रूषण। ते शूद्रकर्म " (१८ : ८८३)

" पै द्विजसेवेपरौते। धावणे नाही शूद्राते
एवं चतुर्वर्णोचिते। दाविली कर्मे " (१८ : ८८४)

मनुस्मृती आणि ज्ञानेश्वरी या दोन ग्रंथांमधील चार वर्णांच्या कामाचे वाटप लक्षात घेण्याजोगे आहे. दोन्ही ठिकाणी व्यक्त होणारी वाटपदृष्टी सारखीच आहे. या साम्याला भूमिकांचे कुलसाम्य असे म्हणता येईल.

**ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व**

समाजात चार वर्ण जन्मानेच ठरतात आणि या चारही वर्णांमध्ये मनुस्मृतीने ब्राह्मणांना सर्वश्रेष्ठ दर्जा दिलेला आहे. काही श्लोक पाहू -

" उत्तमाङ्गोद्भवाज्जैष्ठ्याद्ब्रह्मणश्चैव धारणात्।
सर्वस्यैवास्य सर्गस्य धर्मतो ब्राह्मणः प्रभुः " (१ : ९३)

याचा अर्थ असा की ब्राह्मण हा या सृष्टीचा मुख्य आहे कारण तो सर्वांच्या आधी जन्मला, उत्तम अशा मुख अवयवापासून जन्मला व तो अध्ययन, अध्यापन करतो.

" यस्यास्येन सदाश्नन्ति हव्यानि त्रिदिवौकसः।
कव्यानि चैव पितरः किं भूतमधिकं ततः " (१ : ९५)

याचा अर्थ असा की ज्याच्या सांगण्यावरून देव व पूर्वज हव्यकव्य खातात त्या ब्राह्मणाहून मोठा कोणीही नाही.

" भूतानां प्राणिनंः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः।
बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठा नरेषु ब्राह्मणाः स्मृताः " (१ : ९६)

अर्थ असा की पंचमहाभूतांनी निर्मिलेल्या जडाजड वस्तूत कीटादि श्रेष्ठ; त्यांच्याहून लाभालाभ जाणून बुद्धीने काम करणारा पशु; अशा बुद्धिवानात मनुष्य व मनुष्यात ब्राह्मण श्रेष्ठ होय.

" ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधिजायते।
ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये " (१ : ९९)

" सर्व स्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतम्
श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति " (१ : १००)

अर्थ : सर्व प्राणीमात्रांचा धर्मेश्वर ब्राह्मण असल्याने तो जगात सर्वांमध्ये श्रेष्ठ जन्म घेत असतो. श्रेष्ठता व कुलीनता हे गुण ब्राह्मणात असल्याकारणाने पृथ्वीवर असणारे सर्व द्रव्य ब्राह्मणालाच योग्य व त्याचेच आहे.

" ब्राह्मणं दशवर्षं तु शतवर्षं तु भूमिपम्।
पितापुत्रौ विजानीयाद्‌ब्राह्मणस्तु तयोः पिता " (२ : १३५)

अर्थ : दहा वर्षे वयाचा ब्राह्मण मुलगा शंभर वर्षे वयाच्या क्षत्रियाला पित्याप्रमाणे होय ही मनुस्मृतीची ब्राह्मणाला श्रेष्ठत्व देणारी भूमिका कोणी कशी मान्य करावी ?

" ब्राह्मणः संभवेनैव देवानामपि दैवतम्।
प्रमाणं चैव लोकस्य ब्रह्मात्रैव हि कारणम् " (११ : ८४)

अर्थ : केवळ ब्राह्मण म्हणून जन्माला आल्यानेही ब्राह्मण देवांचाही देव होतो. सर्वांनाच तो प्रमाणभूत ठरतो. कारण ब्राह्मणामध्ये ब्रह्म राहते. मनुस्मृती ब्राह्मणांना अशी सर्वश्रेष्ठ मानते आणि समाजातले त्यांचे सर्वोच्च स्थान कधीही नष्ट होऊ नये याची आपल्या पानापानावर तरतूद करून ठेवते. वेगवेगळ्या वर्णातील माणसांची प्रेते वेगवेगळ्या दिशांनी नेण्यासंबंधीचा निर्देश करून ब्राह्मणाचे प्रेत पवित्र समजल्या जाणाऱ्या पूर्वदिशेकडील दारानेच कसे न्यावे हे पुढील श्लोकात मनुस्मृती सांगते.

" दक्षिणेन मृतं शुद्रं पुरद्वारेण निर्हरेत्।
पश्चिमोत्तरपूर्वैस्तु यथायोगं द्विजन्मनः " (५ : ९२)

म्हणजे शुद्राचे प्रेत नगराच्या दक्षिण दाराने, वैश्याचे प्रेत पश्चिमेच्या दाराने, क्षत्रियाचे प्रेत उत्तरेकडील दाराने आणि ब्राह्मणाचे प्रेत मात्र जिकडून सूर्य उगवतो त्या पूर्वेकडील दारातून न्यावे. ब्राह्मणाने समाजातील आपला सर्वोच्च दर्जा कायम राखावा.

" सत्यानृतं तु वाणिज्यं तेन चैवापि जीव्यते।
सेवा श्ववृत्तिराख्यता तस्मात्तां परिवर्जयेत् " (४ : ६)

म्हणजे व्यापार करूनही ब्राह्मणाने एकवेळ उपजीविका करावी पण सेवा करणे वा नोकरी करणे ही जगण्याची पद्धती कुत्र्याची म्हटली जाते. त्यामुळे ब्राह्मणाने कधीही सेवा करू नये आणि खालच्या प्रतीचे धंदेही त्याने करू नयेत कारण त्यामुळ तो शुद्र होतो.

" सद्यः पततिमांसेन लाक्षया लवणेनच।
त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात् " (१० : ९२)

मांस, लाख व मीठ विकल्यामुळे ब्राह्मण तात्काळ पतित होतो आणि दूध विकल्यामुळे तीन दिवसात तो शूद्र होतो. कारण याच अध्यायात ७५ व्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे वेद शिकविणे, वेद शिकणे, यज्ञ करणे, यज्ञ करून घेणे, दान देणे व दान स्वीकारणे एवढीच कामे ब्राह्मणांनी करावी. ब्राह्मणाला कर्ज दिल्यास दर महिन्याला शेकड्यामागे २ रुपये व्याज घ्यावे. हाच दर क्षत्रियासाठी ३ रुपये आहे. वैश्यासाठी ४ रुपये आहे तर शूद्रासाठी पाच रुपये आहे अशी तफावत मनुस्मृतीने केलेली आहे. ब्राह्मणाला सर्वच संदर्भात अशा विशेष सवलती दिलेल्या आहेत. मनुस्मृतीची ब्राह्मणांवर विशेष मर्जी आहे आणि त्यांच्या विशेष हिताच्या रक्षणासाठी मनुस्मृती सर्व प्रकारच्या सोयी करून ठेवीत आहे हे खालील श्लोकात मनुस्मृती सांगते.

" द्विकं त्रिकं चतुष्कं चं पञ्चकं च शतं समम्।
मासस्य वृद्धिं गृण्हीयाद्वर्णानामनुपूर्वशः " (८ : १४२)

जगातली सर्व संपत्ती ब्राह्मणाची आहे कारण तो श्रेष्ठ आणि उच्चकुलीन आहे हे पुढील श्लोकात मनू सांगतो.

" सर्वं स्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतम्।
श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति " (१ : १००)

हे ब्राह्मणाला दिलेले विशेषाधिकार आपणाला मनुस्मृतीत ठिकठिकाणी दिसतात असाच एक अधिकार म्हणजे भुकेने ब्राह्मणाला मरू न देणे. कारण त्यामुळे सारे राष्ट्रच नष्ट होते.

" यस्य राज्ञस्तु विषये श्रोतियः सीदति क्षुधा।
तस्यापि तत्क्षुधा राष्ट्रमचिरेणैव सीदति " (७ : १३४)

असे आहे. असेच असेल तर राष्ट्र कोण बुडवेल ? राजांनी ब्राह्मणांना भरपूर दान दक्षिणा देत राहिले पाहिजे. शुद्राचा सर्व पैसा अडका ब्राह्मणाने हिरावून घ्यावा. कारण शूद्राचे स्वतःचे असे काहीही नसते. हे मनुस्मृती पुढील श्लोकातून सांगते.

" विस्रब्धं ब्राह्मणः शूद्राद्द्रव्योपादानमाचरेत्।
नहि तस्यास्ति किंचित्स्वं भर्तृहार्यधनो हि सः " (८ : ४१७)

ब्राह्मणांच्या संदर्भात राजाने क्षमाशील वृत्ती ठेवावी. 'ब्राह्मणेषु क्षमान्वितः'

(७-३२) इतर वर्णांच्या तुलनेने ब्राह्मणांना अत्यंत नामनात्र शिक्षा दिली जावी हे मनुस्मृती पुढील श्लोकातून सांगते.

" कौटसाक्ष्यं तु कुर्वाणांस्त्रीन्वर्णान्धार्मिको नृपः।
प्रवासयेद्दण्डयित्वा ब्राह्मणं तु विवासयेत् " (८ : १२३)

इतरांनी खोटी साक्ष दिली तर दंडही घ्यावा आणि त्यांना हद्दपारही करावे. ब्राह्मणाला मात्र दंडही न घेता केवळ घराबाहेर घालवावे. ब्राह्मणहत्येसारखे दुसरे कोणतेही पाप नाही म्हणून ब्राह्मणहत्येचा विचारही राजाने मनात आणू नये हे पुढील श्लोक सांगतो.

" ब्राह्मणवधाद्भूयानधर्मो विद्यते भुवि।
तस्मादस्य वधं राजा मनसापि न चिन्तयेत् " (८ : ३८१)

ब्राह्मणांना विशेषाधिकार देणारे पुढील श्लोक बघा -

" परमप्यापदं प्राप्तो ब्राह्मणान्न प्रकोपयेत्।
ते ह्येनं कुपिता हन्युः सद्यः सबलवाहनम् " (९ : ३१३)

अर्थ : आपत्तीत सापडलेल्या राजानेही ब्राह्मणाचा अवमान करू नये तसे झाले तर ते रागावतील आणि सैन्य, वाहने यांच्या साह्याने राजाचा नाश करतील.

" यैः कृतः सर्वभक्ष्योऽग्निरपेयश्च महोदधिः।
क्षयी चाप्यायितः सोमः को न नश्येत्प्रकोप्य तान् "
(९ : ३१४)

अर्थ : ज्यांनी अग्नीला सर्वभक्षक केले, समुद्राला पिऊन टाकले, चंद्राला क्षयी आणि पुन्हा पूर्ण केले ते ब्राह्मण कुणाला नष्ट करू शकणार नाहीत ?

" अविद्वांश्चैव विद्वांश्च ब्राह्मणो दैवतं महत्।
प्रणीतश्चाप्रणीतश्चयथाग्निर्दैवतं महत् " (९ : ३१७)

अर्थ : अग्नी कुठेही ठेवला असला तरी तो देवताच असतो त्याप्रमाणे ब्राह्मण ज्ञानी असला काय वा नसला काय तो दैवतच आहे.

" एवं यद्यप्यनिष्ठेषु वर्तन्ते सर्वकर्मसु।
सर्वथा ब्राह्मणाः पूज्याः परमं दैवतं हि तत् " (९ : ३१९)

अर्थ : ब्राह्मणांनी कितीही निंद्य कामे केली तरी ते मोठे दैवतच असल्याने पूज्यच असतात. शिवाय राजसभेत प्रवेश करण्याआधी राजाने ब्राह्मणाची पूजा

करावी. ब्राह्मणांना देणग्या द्याव्या (७ : १४५, ७ : २०१) असेही मनुस्मृती आवर्जून सांगते. ज्या, ज्या क्षत्रिय लोकांनी वेदोक्त आचारधर्म, यज्ञ आणि ब्राह्मणांची पूजा केली नाही ते कसे शूद्र कोटीला गेले हे सांगताना मनुस्मृतीने पौंड्रक, औड्र, द्रविड, कम्बोज, यवन, शक, पारद, पल्हव, चीन, किरात, दरद आणि खश या क्षत्रियांचा निर्देश केला आहे. (१० : ४३, ४४)

याप्रकारे मनुस्मृती चार वर्णातील ब्राह्मण या वर्णाची पक्षपाती आहे. मनुस्मृतीतील समाजशास्त्र हे ब्राह्मणश्रेष्ठत्व सांगणारे आणि इतर वर्णांना दुय्यमत्व देणारे आहे. ब्राह्मण हे देवच आहेत, त्यांच्या सुखासाठी सर्वांनी राबले पाहिजे. त्यांचा मान-सन्मान राखला पाहिजे. त्यांची पूजा केली पाहिजे. ज्या गुन्ह्यासाठी इतरांना देहान्तासारख्या, हद्दपारीसारख्या शिक्षा मनुस्मृती सांगते त्याच गुन्ह्यांसाठी मनुस्मृती ब्राह्मणांना अत्यंत किरकोळ शिक्षा सांगते. सर्वच क्षेत्रांमध्ये ब्राह्मणांना मनुस्मृती विशेष सवलती देते. यालाच ब्राह्मणधर्म म्हटले जाते. लोकांना हा ब्राह्मण श्रेष्ठत्वाचा धर्मच पवित्र कसा आहे, तो खुद्द परमेश्वरानेच कसा निर्माण केला आहे आणि या धर्मानुसार न वागणारे कसे अधःपतित होतात तेही मनुस्मृतीने परोपरीने सांगितले आहे.

पुष्यमित्र शुंग हा सामवेदी ब्राह्मण होता. बृहद्रथ या अशोकाच्या नातवाचा वध करून त्याने ब्राह्मणी समाजसंस्था पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आकाशपाताळ एक केले. बुद्धाने नष्ट केलेली चातुर्वर्ण्याची रचना त्याने पुन्हा नव्याने लोकांमध्ये आदरणीय केली. मनुस्मृती इ.स. पूर्व १८५ नंतर पुष्यमित्राच्या काळात (खंड : ३, पृ. २४०) लिहिली गेली असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. ज्ञानेश्वरी इ.स. १२९० मध्ये म्हणजे तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिली गेली. ज्ञानेश्वरीमध्येही ब्राह्मणाचा गौरव आणि चातुर्वर्ण्याचे पावित्र्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

> **" तेचि चारी वर्ण। पुससी जरी कोण कोण**
> **तरी ज्यां मुख्यं ब्राह्मण। धुरेचे कां ॥ " (१८ : ८१८)**

> **" येर क्षत्रिय वैश्य दोन्ही। तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानी।**
> **जे ते वैदिकविधानी। योग्य म्हणौनि " (१८ : ८१९)**

> **" चौथा शूद्रु, जो धनंजया। वेदी लागु नाही तया**
> **तऱ्ही वृत्ति वर्णत्रया - । अधीन तयाची॥ " (१८ : ८२०)**

असे ज्ञानेश्वरी सांगते. चार वर्णांमध्ये ब्राह्मण हे प्रमुख आहे. धुरेचे म्हणजे धुरीण. प्रमुख.

म्हणूनच -

**" पैं द्विजसेवेपरौतें। धावणे नाही शूद्रातें।**
**एवं चतुर्वर्णोचितें। दाविली कर्मे।। " (१८ : ८८४)**

द्विजांची सेवा करण्याव्यतिरिक्त शूद्रांना इतर कोणते काम नाही असे इथे सांगितले गेले आहे.

**" तैसे वर्णाश्रमवशें। जे करणीय आले असे।**
**गोरेया आंगा जैसे। गोरेपण " (१८ : ८८७)**

वर्णानुसार करावयाचे कर्म म्हणजे विहीत कर्म. ते प्रत्येकाने केलेच पाहिजे.

**" हे विहित कर्मपांडवा। आपुला अनन्य ओलावा।**
**आणि हेचि परमसेवा। मज सर्वात्मकाची " (१८-९०६)**

तसेच

**" अगा जया जे विहित। ते ईश्वराचे मनोगत।**
**म्हणौनि केलिया निभ्रांत। सापडेचि तो " (१८ : ९११)**

वर्णानुसार आपल्या वाट्याला आलेले कार्य हे 'ईश्वराचे मनोगत' आहे आणि ते विहीत कर्म केल्याने परमेश्वर निश्चितपणे प्राप्त होतो असे ज्ञानेश्वरी सांगते. वर्णानुसार प्राप्त झालेले कार्य हे 'लल्हाटीचे लिखीत' आहे असे ज्ञानेश्वरी सांगते. कारण स्वतः परमेश्वरच इथे सांगतो की -

**" तुम्हा वर्णविशेषवशे। आम्ही हा स्वधर्मुचि विहिला असे।**
**याते उपासा मग आपैसे। पुरती काम " (३ : ८८)**

आणि हा स्वधर्म आचरणात आणला नाही तर ?

**" म्हणौनि स्वधर्मु जो सांडील। तयाने काळु दंडील**
**चोरू म्हणौनि हरील। सर्वस्व तयाचे " (३ : ११२)**

असे ज्ञानेश्वरी सांगते याचा अर्थ ज्ञानेश्वरीवरही मनुस्मृतीचा फार मोठा प्रभाव आहे असे म्हणता येईल. रामदासांनीही मनुस्मृतीचीच वैचारिक भूमिका अत्यंत प्रखरपणे पुढे नेली आहे. त्यांची काही वचने अशी -

**" नीच प्राणी गुरुत्व पावला। तेथे आचारचि बुडाला।**
**वेदशास्त्र ब्राह्मणाला। कोण पुसे "**

**(दासबोध : दशक १४ स. ७)**

" ब्रह्मज्ञानाचा विचारू। त्याचा ब्राह्मणापासीच अधिकारू।
'वर्णानां ब्राह्मणो गुरुः'। ऐसे वचन॥ (तत्रैव)
गुरुत्व आले नीचयानी। काही एक वाढली महंती
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥ (तत्रैव)
गुरु तो सकळांसी ब्राह्मण। जऱ्ही तो जाला क्रियाहीन।
तरी तयासीच शरण। अनन्यभावे असावे॥
सकळासि पूज्य ब्राह्मण। हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण॥
वेदविरहिते ते अप्रमाण । अप्रिये भगवंता।
ब्राह्मण वेद मूर्तिमंत। ब्राह्मण तोचि भगवंत
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्ये करूनि॥ "

(दासबोध ५ : १, ६, १०,१२)

" अंत्यज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काये करावा
ब्राह्मणासन्निध पूजावा। हे तो न घडे की "

(दासबोध ५-१-१६)

रामदास स्पष्टपणे लिहितात. ते अस्पष्ट असे काहीही ठेवीत नाहीत. शूद्रांचा आणि अंत्यजांचा स्वच्छपणे अधिक्षेप ते करतात. ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व सांगताना ते कोणतीही कसूर करीत नाहीत. मनुस्मृतीने रामदासांनाही अत्यंत आपुलकीने मार्गदर्शन केलेले आहे हे उघडच आहे.

### शूद्रांसंबंधीचा मनुस्मृतीचा अमानुष दृष्टिकोन

शूद्र हा चातुर्वर्ण्यामधला शेवटला वर्ण ! याने फक्त ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या द्विजांची सेवा करावी. त्यातही ब्राह्मणांची सेवा त्याने करावी असे मनुस्मृती सांगते आणि या सेवाकार्यात काही कुचराई केली तरी त्याला कोणकोणत्या शिक्षा कराव्यात याचाही तपशील मनुस्मृतीत आहे. काही श्लोक पाहू !

" शूद्राणां मासिकं कार्यं वमनं न्यायवर्तिनाम्।
वैश्यवच्छौचकल्पश्च द्विजोच्छिष्टं च भोजनम् " (५ : १४०)

म्हणजे ब्राह्मणसेवा करणाऱ्या शूद्राने प्रतिमासी मुंडण करावे. वैश्यासारखे जन्म-मरण शौचकार्य करावे आणि ब्राह्मणांचे उष्टे अन्न खावे.

" शूद्रस्तु वृत्तिमाकाङ्क्षन्क्षत्रमाराधयेद्यदि।
धनिनं वाप्युपाराध्य वैश्यं शूद्रो जिजीविषेत् " (१० : १२१)

" स्वर्गार्थमुभयार्थं वा विप्रानाराधयेत्तु सः।
जातब्राह्मणशद्बस्य सा ह्यस्य कृतकृत्यता " (१० : १२२)

" विप्रसेवैव शूद्रस्य विशिष्टं कर्म कीर्त्यते।
यदतोऽन्यद्धि कुरुते तभ्दवत्यस्य निष्फलम् " (१० : १२३)

" उच्छिष्टमन्नं दातव्यं जीर्णानि वसनानि च
पुलागाश्चैव धान्यानां जीर्णाश्वैव परिच्छदाः " (१० : १२५)

" धर्मेप्सवस्तु धर्मज्ञाः सतां वृत्तमनुष्ठिताः।
मन्त्रवर्ज्यं न दुष्यन्ति द्रशंसां प्राप्नुवन्ति च " (१० : १२७)

" शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः।
शूद्रो हि धनमासाद्य ब्राह्मणानेव बाधते " (१० : १२९)

क्रमशः अर्थ : ब्राह्मणांची सेवा करून निर्वाह होत नसेल तर शूद्राने क्षत्रियाची सेवा करावी व तरीही जमत नसेल तर श्रीमंत वैश्यांची सेवा करावी (१० : १२१)

ब्राह्मणाची सेवा केल्याने उपजीविका चालते व स्वर्गप्राप्तीही होते. ब्राह्मणामुळे त्याची वाहवा होते. (१० : १२२)

ब्राह्मणसेवा हे शूद्राचे कर्म आहे म्हणून त्याने केलेली इतर कर्मे फोल असतात. (१० : १२३)

शूद्राला उष्टे अन्न व जुनी वस्त्रे द्यावी. धान्याचा उरलेला भाग व वापरलेले अंथरूण-पांघरूण द्यावे. (१० : १२५)

धर्मकार्य करू पाहणाऱ्या शूद्रांनी पंच महायज्ञ इत्यादी करावे पण वैदिक मंत्र म्हणू नये. यामुळे त्यांची लोकात कीर्ती पसरते. (१० : १२७)

धनसंचय करण्याची शक्ती असलेल्या शूद्राने कार्यास आवश्यक त्या धनापेक्षा अधिक संचय करू नये. असे झाले तर ते ब्राह्मणाला घातक ठरतील. (१० : १२९) एवढेच नाही तर ब्राह्मणाला धर्माचा उपदेश करणाऱ्या शूद्राच्या कानात व तोंडात तापलेले तेल ओतावे (८ : २७२) हेही मनुस्मृती सांगते.

शूद्राने कोणाही द्विजाला शिवी दिली तर त्याची जीभ छाटावी कारण तो पायापासूनच निर्माण झाला आहे. (८ : २७०) जातीचा उल्लेख करून द्विजाला शिवी देणाऱ्या शूद्राच्या मुखात दहा अंगुळे लांबीचा लोखंडाचा तापलेला खिळा

घालावा (८ : २७१) शूद्राने ब्राह्मणास मारण्याकरिता काठी उचलली, हात उचलला वा लाथा मारल्या तर तो हात वा पाय तोडणेच योग्य होय. (८ : २८०) ब्राह्मणासोबत आसनावर बसणाऱ्या शूद्राच्या कंबरेवर तप्त लोखंडाचा चट्टा देऊन त्याला हद्‌पार करावे किंवा तो मरणार नाही या पद्धतीने त्याचे कुल्ले कापावे (८ : २८१) ब्राह्मणापुढे गर्वाने थुंकणाऱ्या शूद्राचे राजाने ओठ कापावे. ब्राह्मणासमोर लघवी करणाराचे लिंग कापावे आणि तो ब्राह्मणासमोर पादला तर त्याचे गुद कापावे (८ : २८२) गर्वाने ब्राह्मणाचे केस धरणाऱ्या शूद्राचे हात विचार न करता छेदावे किंवा शूद्राने ब्राह्मणाला मारण्यासाठी त्याचे पाय पकडले, दाढी पकडली, मान धरली किंवा वृषण पकडले तर राजाने त्या शूद्राचे दोन्ही हात तोडून टाकावे. (८ : २८३) मारहाण करणे, द्रव्यहरण करणे याप्रकारे ब्राह्मणाला त्रास देणाऱ्या शूद्राला राजाने हालहाल करून ठार मारावे (९ : २४८) असे अत्यंत अमानुष पद्धतीने मनू सांगतो. शूद्र ही माणसे सिंधू संस्कृतीमधील नागवंशाची होती आणि ती चार्वाकांच्या आणि बुद्धाच्या वैचारिक छावणीची अभिमानी होती यामुळे मनूने त्यांचा हा असा सूड घेतला.

वरचे सर्वच श्लोक जरा काळजीपूर्वक आपण लक्षात घ्यायला हवे आहेत. या सर्वच श्लोकांमधून मनुस्मृती शूद्रांचा सांस्कृतिक मृत्यूच चितारीत आहे हेच सभ्य वाचकाच्या मनावर ठसते.

शूद्रांनी ब्राह्मणांचे उष्टे अन्न कशासाठी खावे ? तर स्वर्गात जाण्यासाठी ! पुढल्या जन्मी वर्ण बदलण्यासाठी हे आवश्यक म्हणून ! पण हा जन्म मात्र उष्टे खाण्यातच खर्च व्हायला हवा. ही चार वर्णांची समाजरचना अभेद्य आणि चिरंतन करण्याचीच तरतूद आहे यात शंका नाही. शूद्राचा जन्म हा वरील तीन वर्णांच्या आणि विशेषतः ब्राह्मणांच्या सेवेसाठी निर्माण केला गेला आहे.

इथे एक गोष्ट लक्षात ठेवायची आहे ती ही की अतिशूद्राचा अंतर्भाव चातुर्वर्ण्यात नाही. अतिशूद्र किंवा अंत्यज किंवा अस्पृश्य वैदिकांच्या वा हिंदूंच्या समाजरचनेच्या बाहेरच आहे. या अर्थाने तो हिंदू नाही असे म्हणता येईल. चातुर्वर्ण्य म्हणजे वैदिक धर्म वा हिंदू धर्म आणि हिंदू धर्म वा वैदिक धर्म म्हणजे चातुर्वर्ण्य ! असे समीकरणच तयार झालेले आहे. अस्पृश्य हा लोकसमूह वर्णव्यवस्थेत नाही याचा अर्थ तो धर्माच्याही बाहेर आहे. मूलतः तो धर्मातीतच आहे. तो कुठल्या तरी धर्माचा आहे अशा अफवा आणि आख्यायिका मधल्या काळात पसरविल्या गेल्या. त्यामुळे मधल्या काळात खुद्द अस्पृश्यांच्यासाठीही त्यांची धर्मातीतता काहीशी धुसर झाली होती. १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाचा धम्म दिला आणि ही धुसरताही

पार संपुष्टात आली. अस्पृश्य परत त्याच्या मूळ धर्मातीततेवर आरूढ झाला. पण शूद्र हे हिंदू धर्माचा भाग आहेत कारण चार वर्णात त्यांचा अंतर्भाव झालेला आहे. शूद्र म्हणजे आजच्या इतर मागासवर्गीय जाती म्हणजे ओबीसी. मनुस्मृती या इतर मागासवर्गीयांसाठी असे कडक नियम सांगत आहे.

या इतर मागासवर्गीयांनी फक्त आपल्या वरच्या तीन वर्णांची विशेषतः ब्राह्मणांची सेवा करावी. या लोकांनी इतर काहीही करू नये. मनुस्मृती सांगते की असे केल्याने त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटतो आणि आणखी दुसरा फायदा या सेवेमुळे मिळतो. शुद्राला स्वर्गप्राप्ती होते. हा भावनिक मुद्दा आहे. स्वर्गप्राप्तीचे गाजर हे भयंकर मोहक गाजर आहे. माणसे हजारो वर्षे या स्वर्गाच्या मृगजळामागे धावत आली. ब्राह्मणांची सेवा चाकरी करण्याचे आपले कसब वाढवित आली. शूद्रांनी म्हणजे या इतर मागासवर्गीयांनी ब्राह्मण सेवेशिवाय केलेल्या सर्व गोष्टी अत्यंत निरर्थक आहेत. विघातक आहेत. शूद्राला जुनी वस्त्रे द्यावी. वापरलेले अंथरूण-पांघरूण द्यावे. शूद्रांनी वैदिक मंत्र न म्हटल्याने त्याची कीर्ती पसरते असे मनुस्मृती म्हणते. ही किती विचित्र सवलत आहे नाही ? न शिकण्यामुळे, ज्ञान न मिळवण्यामुळे एखाद्या व्यक्तीची वाहवा होणे ही बाबच विलक्षणच आहे. तुम्ही पशू पातळीवर राहा, तुम्ही मन मारून फक्त ब्राह्मणांची सेवा करा. असे झाले तर काय होईल ? शूद्र किती आज्ञाधारक आहेत, कसे देवभक्त आणि धर्माचा आदर करणारे लोक आहेत असा नावलौकिक होईल. तुम्ही माणूस म्हणून जगू नका, मानवी हक्कांशी तुमची गाठ पडेल असे कधी वागू नका. कारण असे वागल्याने, म्हणजे गुलाम राहण्याने आदर्श गुलाम अशी कीर्ती प्राप्त होते. हे भयंकरच आहे. खरे म्हणजे अशा कीर्तीला आगच लावायला हवी. कुठल्याही कामासाठी आवश्यक तेवढीच संपत्ती शूद्रांनी मिळवावी. त्यापेक्षा अधिक संपत्ती शूद्रांनी बाळगली तर ब्राह्मणांसाठी ते घातक ठरते हे मनू सांगतो. संपत्तीमुळे माणूस स्वावलंबी होतो आणि शूद्राला तर स्वावलंबी, स्वयंपूर्ण होऊच द्यायचे नाही ही मनुस्मृतीची भूमिका आहे. शूद्रांची योग्यता वाढणे, जीवनाच्या आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मयीन अशा सर्व क्षेत्रात तो स्वतंत्र आणि स्वयंभू होणे ब्राह्मणांसाठी धोक्याचे आहे. केवळ आपली सेवा करीत राहणारा आपला गुलाम गमावणे ब्राह्मणांना परवडण्यासारखे नाही. म्हणजे शूद्रांनी ज्ञान मिळवू नये, शूद्रांनी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ नये हा मनुस्मृतीचा आदेश मानवाधिकारांच्या विरोधी आहे. शूद्रांना मूलभूत मानवी अधिकार देण्याला वा शूद्रांना माणूस म्हणून जगू देण्यालाच मनुस्मृतीचा नकार आहे. म्हणूनच 'इति मानवे धर्मशास्त्रे भृगुप्रोक्तायां ...' अशा शब्दांनी मनुस्मृतीच्या प्रत्येकच अध्यायाची समाप्ती

होत असली तरी मनुस्मृतीला मानवधर्मशास्त्र म्हणता येणे अजिबात शक्य नाही. ते ब्राह्मणधर्मशास्त्र आहे हेच मनुस्मृती इथून तिथून सर्वत्र सांगत आहे.

**मनुस्मृतीतील अस्पृश्यता**

अस्पृश्यता ही श्रुतिस्मृति प्रतिपादित आहे आणि ती पाळली पाहिजे असा सनातनी मंडळीचा आग्रह असतो. चर्मम्न, चांडाळ, पौल्कस, वप्ता ही स्मृतींमध्ये अंत्यज मानलेली जातनामे ऋग्वेदात (८-५-३८) आली आहेत असे धर्मशास्त्राच्या इतिहासात डॉ. पां.वा. काणे सांगतात (धर्मशास्त्राचा इतिहास, पूर्वार्ध, पृ. १३४) याच ग्रंथात पृ. १३५ वर काणेंनी मेधातिथीचे प्रतिलोम जातींपैकी फक्त चांडाळ हीच जात अस्पृश्य असते हे मत दिले आहे.

हिंदू आणि बौद्ध यांच्या भांडणातून अस्पृश्यता निर्माण झाली असे डॉ. आंबेडकर सांगतात. डॉ. आंबेडकरांनी आणखी असे लिहिले आहे की शेतीच्या शोधानंतर भटक्या जमाती एके ठिकाणी वस्त्या करून राहू लागल्या. त्यांच्या जास्त उत्पन्नामुळे त्यांच्यावर इतर भटक्या जमाती स्वाऱ्या करीत. त्यांच्यात वारंवार होणाऱ्या युद्धामुळे बऱ्याच जमातींची वाताहत झाली. अशा लोकांना सुस्थिर झालेल्या लोकांनी जवळ केले. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने त्यांना गावाच्या वेशीजवळ जागा दिल्या. समाजातील हीन व गलिच्छ धंदे त्यांना करायला लावले. यातून अस्पृश्यतेचा उदय झाला. अस्पृश्यतेची ही निर्मिती पटण्यासारखी आहे आणि ही प्रक्रिया बुद्धपूर्वकाळातच घडून आली होती. कारण अस्पृश्यतेचे पुरावे जसे वेदात आढळतात. तसा अस्पृश्यांचा निर्देश बौद्ध वाङ्मयातही आलेला आहे. बौद्ध धम्मात अस्पृश्यतेला वा कोणत्याही प्रकारच्या सामाजिक विषमतेला थारा नाही. चांडाळांपासून सर्वांनाच बुद्धाने निब्बाणाचा अधिकार दिला. चांडळांना वेदकाळापासूनच जन्मजात अस्पृश्य मानले जात असावे. मनूचाही तोच दृष्टिकोन आहे. ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांच्या संबंधातून चांडाळाची उत्पत्ती झाली असे मनुस्मृती मानते आणि मनुस्मृतीने चांडाळाला दिलेली वागणूक ही अस्पृश्याला दिलेली वागणूकच आहे यातही शंका नाही. काही श्लोक पाहू.

निषाद जमातीच्या लोकांनी मासेमारी करून पोट भरावे. मेद, आंध्र, चोच, गद्गु यांचे विपरितातील पशू मारणे हे काम आहे. (१० : ४८) क्षता, उग्रव, पुक्कस या जमातींचे कार्य घोरपडी धरण्याचे-मारण्याचे आहे. धिग्वणाचे चामड्याचा व्यापार करणे हे काम आहे तर वेण जातींच्या लोकांचे कार्य वाद्य वाजविणे हे आहे. (१० : ४९) कामे करून पोटे भरणाऱ्या वरील सर्वांनीच गावाबाहेरील सर्वपरिचित वृक्षाखाली, स्मशानात, पर्वताजवळ उघड रीतीने राहावे. (१० : ५०) असे मनू सांगतो.

" चण्डालश्वपचानां तु बहिर्ग्रामात्प्रतिश्रयः।
अपपात्राश्च कर्तव्या धनमेषां श्वगर्दभम्

वासांसि मृतचेलानि भिन्नभाण्डेषु भोजनम्।
कार्ष्णायसमलंकारः परिव्रज्या च नित्यशः " (१० : ५१, ५२)

या श्लोकाचा अर्थ असा की चांडाळ व श्वपच यांनी गावाबाहेर घर बांधून राहावे. यांनी ज्या पात्रात खाल्ले असेल त्या पात्राला अग्नीचा संस्कार केला तरी ब्राह्मणांनी ते घेऊ नये. कुत्रे, गर्दभ हे चांडाळ व श्वपच यांचे धन होय. मेलेल्या मनुष्यांची वस्त्रे त्यांनी वापरावीत शंखादी फुटलेल्या भांड्यात त्यांनी जेवण करावे. लोखंडाचे अलंकार घालावेत आणि सतत फिरत राहावे.

डॉ. पां.वा. काणे यांनी 'धर्मशास्त्राचा इतिहास (पूर्वार्ध पृ. १३५) या ग्रंथात म्हटले आहे की "काही अतिशय पापदायक अपराध केल्यामुळे काही लोक बहिष्कृत आणि अस्पृश्य केले जात असत. ब्रह्महत्या, सुरापान इत्यादी महापातके करणाऱ्याला जातिबहिष्कृत करावे. त्याच्याबरोबर विवाहसंबंध करू नये आणि त्याने सर्व प्रकारच्या वैदिक धर्माचा त्याग करून जगभर परिभ्रमण करावे असे मनूने (९ : २३५-२३९) सांगितले आहे. परधर्मातील अथवा पंथातील लोकांबद्दल वाटणाऱ्या द्वेषामुळे आणि तिरस्कारामुळे त्या लोकांना अस्पृश्य मानले जाई." इथेही बुद्धधम्माची सूचना आपल्याला मिळते. नवव्या अध्यायातील ते श्लोक असे -

" ब्रह्महा च सुरापश्च स्तेयी च गुरुतल्पगः।
एते सर्वे पृथग्ज्ञेया महापातकिनो नराः " (९ : २३५)

" चतुर्णामपि चैतेषां प्रायश्चित्तमकुर्वताम्।
शारीरं धनसंयुक्थं दण्डं धर्म्यं प्रकल्पयेत् " (९ : २३६)

" गुरुतल्पे भगः कार्यः सुरापाने सुराध्वजः।
स्तेये च श्वपदं कार्यं ब्रह्महण्यशिराः पुमान् " (९ : २३७)

" असंभोज्या ह्यसंयाज्या असंपाठ्या विवाहिनाः।
चरेयुः पृथिवी दीनाः सर्वधर्मबहिष्कृताः " (९ : २३८)

" ज्ञातिसंबन्धिभिस्त्वेते त्यक्तव्याः कृतलक्षणाः।
निर्दया निर्नमस्कारास्तन्मनोरनुशासनम् " (९ : २३९)

आणि चांडाळ जातीचा माणूस, रजस्वला, ब्रह्महत्या ज्याच्या हातून घडली आहे असा पतित, बाळंतीण आणि प्रेताला स्पर्श करणारा माणूस यांना ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या वर्णांच्या लोकांनी स्पर्श करू नये. असा स्पर्श झाला तर त्यांनी स्नान करावे. त्यामुळे त्यांना आलेली अशुद्धता नष्ट होते. हा आशय असलेला मनुस्मृतीतला श्लोक असा -

**" दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतिकां तथा।**
**शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुद्ध्यति " (५ : ८५)**

याप्रकारे मनुस्मृतीने अस्पृश्यांना भयंकर पतित करून ठेवले आहे. त्यांनी गावकुसाबाहेर राहावे. प्रेतावरील कपडेच त्यांनी वापरावे. लोखंडाचे दागिने घालावेत. त्यांनी बेटीव्यवहार स्वजातीतच करावा (१० : ५३) इतरांवर त्यांची उपजीविका अवलंबून असावी. त्यांना इतरांनी फुटक्या भांड्यातून अन्न द्यावे. गावात त्यानी रात्रीच्या वेळी फिरता कामा नये. "अन्नमेषां पराधीनं देयं स्याद्भिन्नभाजने। रात्रौ न विचरेयुस्ते ग्रामेषु नगरेषु च" (१० : ५४) आणि

**" दिवा चरेयुः कार्यार्थं चिन्हिता राजशासनैः।**
**अबान्धवं शवं चैव निर्हरेयुरिति स्थितिः " (१० : ५५)**

म्हणजे राजाच्या आज्ञेनेच, त्याचे तिन्ह धारण करून दिवसा कामासाठी गावात हिंडावे. बेवारस प्रेतांची गावाबाहेर नेऊन विल्हेवाट लावावी. अशाप्रकारे चांडाळ, श्वपच इत्यादी जातीच्या लोकांना अत्यंत कडक अशी वागणूक मनुस्मृतीने दिलेली आहे. या मानवधर्मशास्त्राचे हे अमानवी धोरण सर्वांनीच समजावून घेण्याची गरज आहे. हे समजावून घेतले म्हणूनच या अमानुष ग्रंथाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चिता पेटविली.

मनुस्मृतीमध्ये चारही वर्णांचा वेगवेगळा आचार सांगितला आहे आणि त्यात तरतमभाव आहे. त्यातून त्या त्या वर्णातील व्यक्तीच्या सामाजिक दर्जाचे सूचन होते. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांचा दोनदा जन्म होतो. हे तिन्ही वर्ण द्विज आहेत. यांचा एक जन्म आईच्या पोटी होतो आणि दुसरा जन्म मुंज होते तेव्हा होतो. आणि शूद्राचा जन्म मात्र एकदाच होतो कारण त्याची मुंज होत नाही. शूद्रानंतर जे लोक इथे राहत होते आणि ज्यांना अंत्यज, वर्णबाह्य असे म्हटले जात होते त्यांना तर वर्णच नाही. चातुर्वर्ण्यात त्यांचा अंतर्भावच नाही. हे मनुस्मृतीच्या पुढील श्लोकातून स्पष्ट झाले आहे.

" ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः।
चतुर्थ एकजातिस्तु शूद्रो नास्ति तु पञ्चमः " (१० : ४)

याप्रकारे चार वर्णाबाहेरील लोकांना तर मनुस्मृतीने भयंकर अपमानितच केले आहे. पण मुळात तीन किंवा चार वर्णांमध्येही मनुस्मृतीने दर्जाच्या दृष्टीने, सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने जाणीवपूर्वक उच्चनीचता पेरून ठेवलेली आहे. दुसऱ्या अध्यायात ३१ व्या श्लोकापासून पासष्टाव्या श्लोकापर्यंत ही वेगवेगळ्या वर्णांमधील विषमता सांगितली आहे. काही श्लोक पाहू -

" माङ्गल्यं ब्राह्मणस्य स्यात्क्षत्रियस्य बलान्वितम्।
वैश्यस्य धनसंयुक्तं शूद्रस्य तु जगुप्सितम् " (२ : ३१)

याचा अर्थ ब्राह्मणाचे नाव मांगल्यपूर्ण असावे. क्षत्रियाचे बलवाचक असावे, वैश्याचे धनयुक्त व शूद्राचे नाव निंद्य असावे. किळसवाणे असावे.

कार्पासमुपवीतं स्याद्विप्रस्योर्ध्ववृतं त्रिवृत्।
शणसूत्रमयं राज्ञो वैश्यस्याविकसौत्रिकम् "(२ : ४४)

म्हणजे ब्राह्मणाचे जानवे कापसाचे, क्षत्रियाचे तागाचे व वैश्याचे बकऱ्याच्या लोकरीचे आणि तिहेरी असावे व त्याला उजवीकडून पीळ असावा. ब्राह्मणाने भिक्षा मागताना 'भवती भिक्षा दही' म्हणावे. क्षत्रियाने 'भिक्षां भवती देहो' म्हणावे आणि वैश्याने 'भिक्षां देही भवती' म्हणावे हे मनुस्मृती खालील श्लोकातून सांगते.

" भवत्पूर्वं चरेद्भैक्षमुपनीतो द्विजोत्तमः।
भवन्मध्यं तु राजन्यो वैश्यस्तु भवदुत्तरम् " (२ : ४९)

आणि वरील तिन्ही वर्णांमधील लोकांची भेट झाल्यास त्यांना ख्याली-खुशाली विचारताना वेगवेगळे शब्द वापरण्यासंबंधीचा निर्देश मनुस्मृती पुढीलप्रमाणे कर देते.

" ब्राह्मणं कुशलं पृच्छेत्क्षत्रबन्धुमनामयम्।
वैश्यं क्षेमं समागम्य शूद्रमारोग्यमेव च " (२ : १२७)

एवढेच नाही तर वरील तिन्ही लोकांच्या विवाहाचे वेगवेगळे प्रकारही मनुस्मृतीने विशद केले आहेत.

विवाहाच्या संदर्भातही मनुस्मृतीने वेगवेगळ्या वर्णातील लोकांसाठी वेगवेगळे विवाह सांगितले आहेत. मनुस्मृतीच्या तिसऱ्या अध्यायात एकविसाव्या श्लोकापासून चौतीसाव्या श्लोकापर्यंत हा विवाहविचार आलेला आहे. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य,

आसूर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच या विवाहांचे वेगवेगळेपण 'मनुस्मृती' सांगते. वधू-वरांना सजवून, पूजा करून जो विद्वान आहे व कन्येची याचना न करणारा आहे अशा वराला कन्यादान करणे म्हणजे ब्राह्मविवाह होय. (३ : २७) ज्योतिष्टोम यज्ञाच्या आरंभी ऋत्विजांना कन्या अर्पण करणे म्हणजे दैव विवाह होय. (३ : २८) यज्ञासाठी वा मुलीसाठी वराकडून गाय-बैल यांची एक जोडी वा दोन जोड्या घेतल्यानंतर करण्यात येणाऱ्या कन्यादानाला आर्षविवाह म्हणतात. (३ : २९) दोघांनी धर्माचरण करावे अशी प्रार्थना करून वर पूजा केल्यावर करण्यात येणाऱ्या कन्यादानाला प्राजापत्य विवाह म्हणतात (३ : ३०) मुलीच्या पालकास आणि मुलीला द्रव्य देऊन होणारा विवाह आसूर विवाह होय (३ : ३१) परस्परावरील प्रेमातून घडणारा विवाह हा गांधर्व विवाह होय (३ : ३२) तर मुलीच्या पालकास मारून वा धाक दाखवून तिला पळवून आणून केला जाणारा विवाह हा राक्षस-विवाह होय (३ : ३३) मदविव्हळ आणि झोपलेल्या कन्येशी गुप्तपणे मैथुन करणे हा अधार्मिक असा पैशाच विवाह होय (३ : ३४) हे सांगून मनुस्मृती सांगते.

**" चतुरो ब्राह्मणस्याद्यान्प्रशस्तान्कवयो विदुः।**
**राक्षसं क्षत्रियस्यैकमासुरं वैश्यशूद्रयोः " (३ : २४)**

म्हणजे ब्राह्म, दैव, आर्ष आणि प्राजापत्य हे चार विवाह ब्राह्मणांसाठी श्रेयस्कर आहेत. क्षत्रियाला राक्षसविवाह श्रेयस्कर आहे तर वैश्य आणि शूद्र यांना आसूर विवाह योग्य होय. आतिथ्यासंबंधी आणि भोजन यासंबंधीही मनुस्मृतीने काही दंडक सांगितले आहेत.

वैश्य किंवा शूद्र ब्राह्मणाच्या घरी अतिथी म्हणून आले तर त्यांना घरच्या नोकरांसोबत जेवू घालावे. हे पुढील श्लोक सांगतो.

**" वैश्यशूद्रावपि प्राप्तो कुटुम्बेऽतिथिधर्मिणौ।**
**भोजयेत्सह भृत्यैस्तावानृशंस्यं प्रयोजयन् " (३ : ११२)**

आणि ब्राह्मणाच्या घरी क्षत्रिय, वैश्य, शूद्र, मित्र, आप्त किंवा गुरु हे अतिथिसमान मानले जाऊ नयेत. हे पुढील श्लोक सांगतो.

**" न ब्राह्मणस्य त्वतिथिर्गृहे राजन्य उच्यते**
**वैश्यशूद्रो सखा चैव ज्ञातयो गुरुरेव च " (३ : ११०)**

ब्राह्मणाव्यतिरिक्त इतर वर्णांच्या लोकांबद्दल कडवा दुजाभाव इथे प्रकट झालेला आहे. ब्राह्मण वजा जाता मनुस्मृतीत इतर सर्वांनाच अत्यंत नीच, नगण्य आणि तुच्छ

म्हणून गणले गेले आहे. इतर सर्वांनीच ब्राह्मणाचा सर्व संदर्भात सन्मान केला पाहिजे. त्याचे श्रेष्ठत्व जपले पाहिजे असे सांगणारी मनुस्मृती इतर वर्णांबद्दल मात्र अवमानाच्याच भाषेत बोलते. सामाजिकदृष्ट्या या सर्वांनाच ती अप्रतिष्ठित करते.

**मनूने स्त्रीचे स्वातंत्र्य जाळले**

मनुस्मृतीने स्त्रियांनाही असेच अपमानित करून ठेवलेले आहे. मनुस्मृतीने स्त्रियांना स्वातंत्र्यापासून पूर्णतः वंचित ठेवले आहे. नववा अध्याय स्त्रिच्या निंदेनेच सुरू होतो. नवव्या अध्यायाचे हे प्रारंभीचेच श्लोक असे -

**" अस्वतन्त्राः स्त्रियः कार्याः पुरुषैः स्वैर्दिवानिशम्।**
**विषयेषु च सज्जन्त्यः संस्थाप्या आत्मनो वशे " (९ : २)**

**" पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।**
**रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंन्त्रमर्हति " (९ : ३)**

या श्लोकाचा अर्थ असा : जवळच्या आप्त पुरुषाने स्त्रियांना आपल्या ताब्यातच ठेवावे. त्यांना इतर विषयांची चटक लागू देऊ नये. त्यांच्यावर रात्रंदिवस नजर ठेवावी आणि स्त्रीच्या लहानपणी तिला तिच्या वडिलाने सांभाळावे. तरुणपणी तिला तिच्या पतीने संरक्षण द्यावे तर तिच्या म्हातारपणी तिला तिच्या मुलांनी सांभाळावे. स्त्री अशी सतत पराधीन आहे. ती स्वातंत्र्यास पात्र नाही. हाच आशय पाचव्या अध्यायातही मनुस्मृतीने सांगितला आहे. लहान मुलीने, तरुण स्त्रीने वा म्हाताऱ्या बाईनेही घरातले काम स्वतःच्या अधिकारात कधी करू नये हे सांगणारा श्लोक असा -

**" बालया वा युवत्या वा वृद्धया वापि योषिता।**
**न स्वातंन्त्र्येण कर्तव्यं किंचित्कार्य गृहेष्वपि " (५ : १४७)**

स्त्रीने लहानपणी पित्याच्या छत्राखाली राहावे. तरुणपणी पतीच्या छत्राखाली राहावे आणि म्हातारपणात तिने मुलाच्या छत्राखाली राहावे. स्वतंत्रपणे वा स्वतंत्रवृत्तीने कधीही राहू नये हे सांगणारा श्लोक असा -

**" बाल्ये पितुर्वशे निष्ठेत्पाणिग्राहस्य यौवने।**
**पुत्राणां भर्तरि प्रेते न भजेत्स्त्री स्वतन्त्रताम् " (५ : १४८)**

पुढल्या श्लोकातच मनुस्मृती हे सांगते की पिता, पती आणि पुत्र यांच्यापासून दूर राहणारी स्त्री दुष्कृती झाली तर ती दोन्ही कुळास कलंक लावते.

" स्वभाव एव नारीणां नराणामिह दूषणम्।
अतोऽर्थान्न प्रमाद्यन्ति प्रमदासु विपश्चितः " (२ : २१३)

" अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः।
प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम् " (२ : २१४)

या श्लोकाचा अर्थ असा की नट्टापट्टा करून पुरुषांना बिघडविणे हा स्त्रियांचा स्वभावच आहे म्हणून ज्ञानी माणसे त्या वाटेला जात नाहीत. शिवाय स्त्रिया शरीराच्या क्रोध, काम अशा विकारांमुळे ज्ञानी-अज्ञानी पुरुषांना कुमार्गास लावू शकतात.

" पौंश्चल्याश्च लचित्ताच्च नैस्नेह्याच्च स्वभावतः।
रक्षिता यत्नतोऽपीहि भर्तृष्वेता विकुर्वते " (९ : १५)

म्हणजे पुरुषांना पाहताच स्त्रियांच्या मनात संभोगाची इच्छा उत्पन्न होते. त्या चंचल असतात. अप्रेमी असतात. म्हणून कितीही रक्षण केले तरी त्या व्यभिचारी वागण्याचा संभव असतो. खालच्या श्लोकातही स्त्रीची अशीच निर्भत्सना मनुस्मृतीने केलेली आहे -

" शय्यासनमलंकारं कामं कोधमनार्जवं।
द्रोहभावं कुचर्यां च स्त्रीभ्यो मनुरकल्पयत् " (९ : १७)

म्हणजे विश्वाची उत्पत्ती झाली तेव्हापासूनच झोपा काढणे, दागिन्यांचा मोह, बसून राहणे, क्रोध, कामभावना, द्वेष, निंदा आणि हिंसा या गोष्टी मनूने स्त्रियांना दिलेल्या आहेत. कोणाही संवेदनशील आणि समताशील स्त्रीच्या तळपायाची आग मस्तकात जावी आणि कोणाही सुसंस्कृत आणि सुसभ्य पुरुषाचे माथे भडकावे अशीच ही स्त्रीनिंदा आहे यात शंका नाही. अनेक लोक कुटुंबात असताना स्त्रीने पतीच्या आज्ञेशिवाय वेगळा धनसंचय करू नये हे नवव्या अध्यायातील १९९ व्या श्लोकात मनुस्मृती सांगते. स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नाही हे पाचव्या अध्यायातील १६२ व्या श्लोकात मनुस्मृती सांगते. एवढेच नाही तर नवऱ्याने आपली बायको विकली वा टाकली तरी नवऱ्याचा तिच्यावरील अधिकार नष्ट होत नाही; ती नवऱ्याचीच पत्नी राहते हे मनुस्मृती पुढील श्लोकात सांगते -

" न निष्क्रयविसर्गाभ्यां भर्तृभार्या विमुच्यते।
एवं धर्म विजानीमः प्राक्प्रजापतिनिर्मितम् " (९ : ४६)

इथेही स्त्रीच्या पुनर्विवाहाला मनुस्मृती नकार देते ही बाब आपल्या लक्षात येते. शिवाय नवरा मेल्यावर जी स्त्री ब्रह्मचर्याचे पालन करते तिला स्वर्गप्राप्ती होते असे मनू सांगतो. पती कसाही असला तरी स्त्रीने पतीला परमेश्वरच मानावे. नवरा दुराचारी असो, स्वैराचारी असो किंवा कोणताही गुण त्याच्यात नसो स्त्रीने त्याला परमेश्वर मानावे आणि त्याची सेवा करावी. पती जुगारी, मद्यपी, रोगपीडित वा षंढ असला तरी स्त्रीने त्याची सेवाच करावी हे मनू पुढील श्लोकात सांगतो.

**" विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वापरिवर्जितः ।**
**उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पत्तिः " (५ : १५४)**

आणि स्त्रियांना इतर यज्ञ व पतीच्या आज्ञेशिवाय इतर उपवास व व्रते नाहीत. पण तिने केलेली पतीसेवा हीच तिला स्वर्गप्राप्ती करून देते. हे सांगणारा श्लोक असा -

**" नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम्**
**पतिं शुश्रुषते येन तेन स्वर्गे महीयते " (५ : १५५)**

आणि मृत्यूनंतर पती ज्या लोकाला गेला असेल त्याच लोकात जाण्याची इच्छा पत्नीने बाळगावी. पती जिवंत असो वा मृत असो त्याला रूचणार नाही असे कोणतेही वर्तन पत्नीने चुकूनही करू नये हे -

**" पाणिग्राहस्य साध्वी स्त्री जीवतो वा मृतस्य वा ।**
**पतिलोकमभीप्सन्ती नाचरेत्किंचिदप्रियम् " (५ : १५६)**

या श्लोकात मनुस्मृती सांगते आणि -

**" नास्ति स्त्रीणां क्रिया मन्त्रेरिति धर्मे व्यवस्थितीः ।**
**निरीन्द्रिया ह्यमन्त्राश्च स्त्रियोऽनृतमिती स्थितीः " (९ : १८)**

या श्लोकात मनूने स्त्रियांवरील संस्कारांना वैदिक मंत्र नाकारले. वैदिक मंत्रांचे संस्कार न झालेल्या या स्त्रिया म्हणजे केवळ असत्य होत असे सांगणारा मनू स्त्रियांचा विचार जनावरांसोबत करतो. (५ : १३०) शिवाय तीस वर्षांच्या तरुणाने बारा वर्षांच्या मुलीशी किंवा चोवीस वर्षांच्या तरुणाने आठ वर्षांच्या मुलीशी लग्न करावे. (९ : ९४) असे मनू सांगतो. मनू स्त्रियांना रत्न म्हणतो व या रत्नांचा संग्रह कुठूनही करावा (२ : २४०) असे सांगतो. पुरुषांच्या अनिर्बंध भोगेच्छेला मोकळिक देतो. स्त्री मनूने दुर्गुणसंपन्न म्हणूनच चितारली. मग -

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया: " (३ : ५६)

जिथे स्त्रियांची पूजा होते तिथे देवता प्रसन्न होतात असे इथे मनू का म्हणतो? स्त्रियांच्या गुलामगिरीचे टोकाचे समर्थन करणारा मनू असे का म्हणतो ? प्रा. नरहर कुरुंदकरांच्या भाषेत या श्लोकातील मनूची मखलाशी पुढीलप्रमाणे सांगता येईल. "... पण नारी पूजनीय केव्हा होते ? सर्वस्वाने व स्वेच्छेने जर ती गुलामगिरीत धन्यता मानू लागली तरच ती पूजनीय होते. स्त्री ही दुष्कुलातले असले तरी रत्नच मानावे असेही मनूचे मत आहे. पण या मताचा अर्थ इतकाच आहे की देखणी स्त्री उपभोगासाठी स्वीकारताना भोगसुख पहावे, तिच्या कुलाचा विचार करू नये. अन्नवस्त्राच्या मोबदल्यात प्रजोत्पादन व सेवा यांचे एक साधन म्हणून स्त्री आहे यामुळे स्त्रीप्रशंसापर सारी वचने निरर्थक ठरतात." (मनुस्मृती काही विचार : १९८३, पृ. ६८) स्त्रीने मनूच्या कायद्यानुसार गुलाम राहून दाखविले तरच ती आदर्श आणि पूजनीय मानली जाईल हा मनुस्मृतीचा प्रस्ताव गुलामगिरीच्या सत्काराचा प्रस्ताव आहे आणि समता या मूल्याला महामूल्य मानणाऱ्या कोणाही सभ्य माणसाला हा दुष्ट प्रस्ताव मान्य होणेच शक्य नाही.

या देशात जन्म झालेल्या ब्राह्मणापासून सर्व जगातील लोकांनी सदाचार शिकावा (२ : २०) असे मनू म्हणतो. "मनुस्मृती फक्त जन्माने ब्राह्मण असणाऱ्या व्यक्तींच्या इहलोकातील हितसंबंधांचा विचार करते व ते हितसंबंध सांभाळण्यासाठी इतरांना गुलाम करणाऱ्या विषम समाजरचनेला पूज्य ठरविण्याचा प्रयत्न करते." (मनुस्मृती : काही विचार : नरहर कुरुंदकर, पृ. १६०) ही अशी मनुस्मृती जाळणे मानवी प्रतिष्ठेच्यासाठी अपरिहार्यच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २८.१०.१९५१ रोजी लुधियाना येथील भाषणात म्हटले आहे की "जेव्हा आर्य भारतात आले तेव्हा वर्णव्यवस्था कार्यरत झाली. लोकांना त्यांच्या जन्मावरून सामाजिक दर्जा देण्यात आला. काहींना ब्राह्मण म्हणण्यात आले. काहींना क्षत्रिय, काहींना वैश्य आणि इतरांना अस्पृश्य" (रायटिंग्ज अँड स्पीचेस, खंड १८, भाग ३, पृ. २५७) म्हणूनच आता हे सांगितले पाहिजे की मनुस्मृती हा या बाहेरून आलेल्या ब्राह्मणांची सर्व प्रकारची सांस्कृतिक सत्ता प्रस्थापित करणारा, त्यांचे वंशश्रेष्ठत्व साबीत करणारा आणि त्यासाठी इतरांना हजारो वर्षे न विझणारी गुलामीची भीषण आग लावणारा ग्रंथ आहे. त्याला तेवढ्याच भीषण आगीत जाळणे हाच उपाय होता. डॉ. आंबेडकरांनी त्यासाठीच मनुस्मृती जाळली.

□□□

'डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली ?' या पुस्तिकेत डॉ. यशवंत मनोहर यांनी मनुस्मृती केंव्हा आणि कशी निर्माण झाली, तिचा लेखक कोण आणि मनुस्मृतीमधील विषमतेची भीषणता इत्यादी गोष्टींचा नेटका विचार केलेला आहे.

मनुस्मृतीने स्त्रियांच्या, शूद्रातिशूद्रांच्या, आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांच्या अनेक पिढ्या जाळल्या. मनुस्मृती ही घृणेचे अत्यंत जलाल असे प्रसारमाध्यम आहे. कोट्यवधींच्या माणुसकीची होळी करणाऱ्या या मनुस्मृतीची होळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे "Manu is not a matter of the past. It is even more than a past of the present. It is a 'living past' and therefore as really present as any present can be." मनुस्मृती आजही परिवर्तनाच्या लहानमोठ्या प्रयत्नांना जाळतेच आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी जाळलेली मनुस्मृती प्रत्येकानेच आपापल्या मनातून जाळून टाकायला पाहिजे. हे सांगण्यासाठी डॉ. यशवंत मनोहरांनी या पुस्तिकेतून मनुस्मृतीमधील विषमतेच्या जहराचा नेटका परिचय करून दिला आहे.

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर